● रविवार, दि २२ सप्टेंबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ६१ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886




https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## अवैध वाळू उत्खनन, वाहतुकीकडे दुर्लक्ष!

### दुधा सज्जाचे तलाठी महेंद्र साळवे यांचे अखेर निलंबन

**योगेश गणगे**

**मंठा -** मंठा तालुका म्हणजे अवैध वाळू उत्खनन आणि अवैध वाहतुकीचे जणू केंद्रात बनलेले असून, प्रशासनाचे याकडे याकडे दुर्लक्ष आहे. पूर्णा नदीतून मोठ्या प्रमाणात अवैध उपसा आणि वाहतूक होत असून, प्रशासनातील साखळी आपली तुंबडी भरत आहे. दुधा ( ता. मंठा ) सज्जाचे तलाठी महेंद्र साळवे यांचे अखेर निलंबन झाले असून, पुर्णा नदीकाठच्या अवैध वाळू उत्खनन व वाहतूकीकडे दुर्लक्ष करणे त्यांना भोवले असल्याचे बोलले जात आहे. या धडक कारवाईचे अभिनंदन होत आहे. मात्र, पुर्णा नदीकाठच्या अवैध वाळू चोरीला फक्त एकटाच तलाठी जबाबदार का, असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित करण्यात येत आहे. मंडळ अधिकारी व तहसीलदारांची जबाबदारी नसते का ? त्यांच्यावर कोण व कधी कारवाई होणार, हे प्रश्न अनुत्तरीत आहेत. जिल्हा प्रशासन फक्त एकाच तलाठ्यावर कारवाई करुन हजारो ब्रास वाळू चोरी प्रकरणी बहुचर्चित वाळूचोरांसह इतरांना मोकळीक देऊ पाहतेय का, वाघाळा - टाकळखोप्यात बारमाही वाळू चोरीचा गोरखधंदा चालतो कसा? पुर्णा नदीकाठचे वाळूचोर प्रशासनाचे जवाई लागतात यांसह अनेक प्रश्न सर्वसामान्य जनतेतून उपस्थित केले जात आहेत.



## शासनाच्या भूसंपादीत जमिनीची फेरफार व विक्री

### महसुल अधिकाऱ्यांचा प्रताप; जिल्हाधिकारी यांनी दिले चौकशीचे निर्देश

**जाफराबाद । प्रतिनिधी -** महसूल विभाग हा अधिकार अभिलेखे ठेवणारा व वेळोवेळी अद्यावत करणारा शासनाचा महत्त्वाचा विभाग आहे. या विभागाकडे खाजगी शेत जमिनी तसेच शासकीय जमिनीचे देखील अधिकार अभिलेख ठेवण्याची महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ व त्या खालील अधिकारी अभिलेख्यांचे नियम १९७१ अन्वये कायदेशीर जबाबदारी आहे. मात्र, या विभागाचे कारनामे एक ना अनेक प्रकारे नेहेमीच चर्चेत असतात. सामान्य शेतकरी व भूधारक यांचे अनेक दिवाणी हक्क शेतजमिन या मालमत्तेशी जोडले गेलेले मात्र, महसूल अधिकारी अनेक वेळा सर्व कायदेशीर तत्त्वांना व नैसर्गिक न्याय तत्त्वांना बाजूला ठेऊन हितसंबंधितांना नोटीस न देता भूधारक व खातेदारांचे मूलभूत दिवाणी हक्क हिरावून घेत असतात. असाच एक गंभीर प्रकार जाफ्राबाद तालुक्यातील टेंभूर्णी येथील गट नं. १२७ बाबत घडला असून यामध्ये खुद्द महसुल मंत्री यांनी जिल्हाधिकारी जालना यांना या प्रकरणात चौकशी करुन कारवाई करण्याचे निर्देश दिलेले आहे.




मौजे टेंभूर्णी येथील गट नं. १२७ मधून राज्य मार्ग गेलेला असून त्यात जमिनीचे यापुर्वीच भूसंपादन झालेले आहे. हे भूसंपादन अनेक वर्षांपुर्वी झाल्याचे निवाड्यावरून दिसून येते. मागील वर्षी म्हणजेच २०२३ मध्ये या ाबबत फेरफार घेऊन महाराष्ट्र शासनाची नोंद सातबारा या अधिकारी अभिलेख्याच्या मालकी हक्कात व इतर हक्कात घेण्यात आलेली आहे. असे असतांना तहसिलदार जाफ्राबाद यांनी घड्याळाची काटे उलटे फिरवत पुन्हा दिनाक ८ जुलै २०२४ रोजी तलाठी टेंभुर्णी यांना पत्र देऊन शासनाच्या नावे झालेल्या जमिनीच्या मालकी हक्कात पुन्हा फेरबदल केला. सामान्य लोकांच्या अर्ज विनंत्यांना वेळीच दखल न घेणारे तलाठी यांनी मात्र, एकाच दिवशी पत्राआधारे नोंद घेऊन शासकीय मालकीची संपादीत जमीन पुन्हा खाजगी लोकांच्या नावे करण्याचा प्रताप केला आहे. कळस म्हणजे सदर फेरफारनंतर या शासकीय जमिनीची अतिशिघ्रपणे खाजगी व्यक्तीच्या नावे नोंदणीकृत खरेदीखताआधारे विक्री करण्यात आली आहे.

महसुल मंत्र्यांच्या या प्रतापामुळे महसुल मंत्री यांच्याकडे प्रशांत अमरचंद ओस्तवाल यांनी तक्रार केल्यानंतर महसूल मंत्र्यांनी जालना जिल्हाधिकाऱ्यांना चौकशी करुन कारवाई करण्याचे निर्देश दिले होते. जिल्हाधिकारी यांनी तक्रारीच्या अनुषंगाने मुद्देनिहाय अहवाल तीन दिवसात जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करण्याचे निर्देश जाफ्राबादच्या तहसिलदारांना दिले असून विवादित प्रकारणातील प्रलंबित फेरफार क्रं ८१९४ हा तक्रारीच्या अनुषंगाने पूर्ण चौकशी होईपर्यंत पुढील आदेशापर्यंत मंजुरीची कार्यवाही करण्यात येऊ नये याबबात आपल्या स्तरावरून संबंधीत तलाठी-मंडळ अधिकाऱ्यांना निर्देश देण्याचे आदेश दिले आहेत.

या प्रकरणात जिल्हाधिकारी यांच्यासमोर ॲड. अमोल साळोक, ॲड. संदीप लोखंडे यांनी युक्तीवाद केला.

## काँग्रेसचे प्रभारी चौधरी यांचा आजचा दौरा रद्द

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सहराज्य प्रभारी तथा अ. भा. काँग्रेस कमिटीचे सचिव कुणाल चौधरी हे आगामी विधानसभा निवडणुकीच्या पूर्वतयारीसाठी दि. २२ सप्टेंबर २०२४ रविवार रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणार होते. त्यांचा आयोजित दौरा रद्द झाल्यामुळे जालना जिल्हा ग्रामीण/ शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सभागृह टाऊन हॉल, जालना येथे आयोजित बैठक रद्द करण्यात आल्याची माहिती जालना ग्रामीण व शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजाभाऊ देशमुख, शेख महेमूद यांनी दिली आहे.

## केंद्र व राज्य शासनाने विविध योजनांच्या माध्यमातून दिव्यांगांचा सन्मान

### आमदार बबनराव लोणीकर यांचे प्रतिपादन; मंठा तालुक्यातील दिव्यांग लाभार्थ्यांना विविध साहित्याचे वाटप

**मंठा । प्रतिनिधी -** केंद्र व महायुतीच्या महाराष्ट्र शासनाने विविध योजनांच्या माध्यमातून दिव्यांगांचा सन्मान केला आहे. दिव्यांगांच्या विकासासाठी अनेक योजना प्रभावीपणे राबवून दिव्यांगाना सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक विकासाच्या प्रवाहामध्ये आणण्याचे महत्वपूर्ण काम केले आहे असे प्रतिपादन माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी आज केले

तहसील कार्यालय मंठा येथे आयोजित दिव्यांग बांधवांना मोफत साहित्य वाटप कार्यक्रम प्रसंगी श्री लोणीकर बोलत होते यावेळी बोलताना श्री लोणीकर म्हणाले की राज्य व केंद्रीय अर्थसंकल्पामध्ये दिव्यांगांच्या विकासासाठी भरीव तरतूद करण्यात आली असून दिव्यांग बांधवांनी विविध योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन आवाहन देखील यावेळी लोणीकरांनी केले. दिव्यांग बांधवांना मोफत साहित्य वाटप कार्यक्रम प्रसंगी २ बॅटरी ऑपरेटेड ट्रायसायकल, ४७ ट्रायसायकल, ४६ व्हील चेअर आणि सिपी चेअर, २७२ चालण्याच्या काठ्या, २२ ब्रेल छडी, १३ सुगम्य छडी, २ स्मार्ट फोन, **पान २ वर**



युवा आदर्श

### पितर ...

**अंगठ्याने प्या जल**
**संतुष्ट होतात पितर**
**पितृपक्ष सुरु राहता**
**खुशीत येतात इतर**
**आठवण येते त्यांची**
**रे निदान गेल्यानंतर**
**भयापोटी नामओठी**
**लक्षात राही चिरंतर**
**जपावे जीवंत वरिष्ठा**
**नकात देऊ रे अंतर**
**जाणीव ही द्यायला**
**निघावा काही मंतर**
**धर्माच्या नावाखाली**
**विरघळू जाय पत्थर**
**शोधायला जाल तर**
**उपाय मिळती सत्तर**
**पिंडाचे गोळे खाती**
**कावळे बावळे तितर**
**मंत्रोच्चारे काय शक्ती**
**कोण करतो खातर**
**शुक्ल काष्ठ मागे नको**
**खर्च होऊ दे बेहत्तर**
**निमित्ताने दानधर्म**
**पुण्य कर्मास्तव उत्तर**

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## वरखेड सि.गावातून भाजपा हद्दपार!

### माजी पंचायत समिती सदस्य, सरपंच, उपसरपंच व सदस्य शिवसेनेत

**जालना । प्रतिनिधी -** येथील विधानसभा मतदारसंघातील मौजे वरखेड सिंदखेड तालुका जालना या गावांमध्ये भारतीय जनता पार्टीला जबरदस्त खिंडार पडले असून गावातील माजी पंचायत समिती सदस्य तथा विद्यमान सरपंच सर्जेराव आण्णा शेवाळे, उपसरपंच गणेशराव शेवाळे, ग्रामपंचायत सदस्य नंदू आप्पा काटकर, माजी उपसरपंच गणेशराव शेवाळे, ग्रा.पं. सदस्य सोनाजीराव घडलिंग,गोंदेगाव चे माजी चेअरमन रंजनराव खरात, गणेश शेवाळे माजी शालेय समिती अध्यक्ष, कचरू आप्पा काटकर ,धोंडीराम काटकर, कार्तिक आप्पा काटकर ,आदी कार्यकर्त्यांनी शिवसेना उपनेते तथा माजी राज्यमंत्री अर्जुनरावजी खोतकर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये भाग्यनगर येथील दर्शना बंगल्यावर शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला. यावेळी शिवसेना जिल्हा संपर्क नेते पंडितराव भुतेकर, उपजिल्हाप्रमुख संतोषराव मोहिते, तालुकाप्रमुख भगवानराव अंभोरे, जालना बाजार समितीचे संचालक **पान २ वर**



## इनरव्हील होरायझनतर्फे पांजरापोळ ट्रॅकवर आरोग्यवर्धक फिटनेस बॅनरद्वारे जनजागृती




**जालना । प्रतिनिधी -** ईन्नरव्हील क्लब ऑफ जालना होरायझनतर्फे पांजरापोळ गोशाळेच्या जॉगिंग ट्रॅकवर शुक्रवार दि. २० सप्टेंबर रोजी आरोग्यवर्धक जनजागृतीपर २८ संदेश फलक लावण्यात आले.

पांजरापोळ जॉगिंग ट्रॅकवर दररोज सकाळी आणि सायंकाळी हजारो लोक नियमितपणे या ट्रॅकला भेट देतात. तसेच शेकडो लोक जॉगिंग, चालणे, व्यायाम, योगा आणि गोसेवा करण्यासाठी येथे येतात.त्यात शाळेची मुलेदेखील असतात. या उपक्रमाचा उद्देश लोकांना सुदृढ आरोग्यासाठी संदेश वाचण्यास प्रवृत्त करून त्यांना नियमित व्यायाम करण्यास आणि आपल्या आरोग्याला प्राधान्य देण्यास प्रेरित करणे हा उद्देश आहे. आपल्या शरीराचे मोल सर्वात मोठे असून **पान २ वर**

## लॉयन्स क्लबतर्फे रक्तदान शिबिर



**जालना । प्रतिनिधी -** लायन्स क्लब जालनातर्फे जनकल्याण रक्त पेढीत २० सप्टेंबर रोजी घेण्यात आलेल्या रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात १५ जणांनी स्वयंस्फूर्त रक्तदान केले. शिबिरादरम्यान रक्तदानाचे महत्त्व विषद करण्यात आले.

या शिबिराल अतुल लड्ढा, जयप्रकाश श्रीमाली, मंजु श्रीमाली, प्रतिक लड्ढा, कृष्णा लड्ढा, शरद गांधी, पांडुरंग सांगळे, ज्योती लड्ढा, आनंद भक्कड आदींनी रक्तदान केले. यावेळी दिनेश लोहिया, विठोबा दराडे, अध्यक्ष जयश्री लड्ढा,सदस्य द्वारकादास मुंदडा, बळीराम बेंद्रे, बालाप्रसाद भक्कड, पी. के. खरात आदी उपस्थित होते. या शिबिरात जनकल्याण रक्त पेढीचे विश्वस्त पुसाराम मुंदडा यांनी आतापर्यंत १२१ वेळा रक्तदान करणारे जनकल्याण रक्तपेढीचे विश्वस्त पुसाराम मुंदडा **पान २ वर**

## भाजपा जालना महानगरच्या संघटनात्मक नियुक्त्या जाहीर

**जालना । प्रतिनिधी -** माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे व भाजपा प्रदेशाध्यक्ष आ. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सुचनेनुसार भाजपा प्रदेश निमंत्रित सदस्य विजय कामड व सौ. विमलताई आगलावे यांची आज (दि.२१) रोजी पत्राद्वारे नियुक्ती करण्यात आली आहे. यावेळी भारतीय जनता पार्टी जालना महानगरची कार्यकारिणी भाजपा जिल्हा कार्यालय जालना येथे जालना विधानसभा प्रमुख भास्कर दानवे यांच्या प्रमुख उपस्थितीत व भाजपा जालना महानगराध्यक्ष अशोक पांगारकर यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर करण्यात आली.

यात भाजपा जालना महानगराचे दहा भाग करण्यात आले व त्याला मंडळ असे नाव देण्यात आले यापैकी मंडळ अध्यक्ष पदी १. ढवळेश्वर मंडळ अध्यक्ष सुभाष चंदुलाल सले, २. कन्हैय्यानगर मंडळ अध्यक्ष बाबुराव शंकरराव भवर, ३. चंदनझिरा मंडळ सोमनाथ माणिकराव गायकवाड, ४. कसबा मंडळ रामलाल सुखलाल जाधव, ५. बाजारपेठ मंडळ आनंद शिवाअप्पा झारकंडे, ६. राम नगर मंडळ सौ.सखुबाई गुलाब पणबिसरे, ७. गांधीचमन मंडळ आनंत म्याका, ८. भाग्यनगर-शिवनगर मंडळ श्रीकांत वसंतराव शेलगावकर, ९. आनंदवाडी मंडळ मनोज बिडकर, १०. अंबडरोड मंडळ सुमित सुधाकरराव सुरडकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

भाजपा जालना महानगर मंडळ प्रभारी पदी ढवळेश्वर मंडळ प्रभारी अमोल दत्तात्रय कारंजेकर, कन्हैय्यानगर मंडळ दुर्गेश रतनलाल कुरील, चंदनझिरा **पान २ वर**




# संपादकीय

## बहुजन समाजापर्यंत शिक्षणाची गंगा पोहचवणारे आधुनिक भगीरथ

बहुजन समाजापर्यंत शिक्षणाची गंगा पोहचवणारे आधुनिक काळातील भगीरथ रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांची आज जयंती. कर्मवीर भाऊराव पाटील यांचा जन्म कोल्हापूर जिल्ह्यातील कुंभोज या गावी २२ सप्टेंबर १८८७ रोजी झाला. सांगली जिल्ह्यातील ऐतवडे हे त्यांचे मूळ गाव होय. कर्मवीर भाऊराव पाटील हे लहानपणापासूनच बंडखोर प्रवृत्तीचे होते. तत्कालीन जातीव्यवस्थेत उच्च जातींकडून कनिष्ठ जातींवर होणाऱ्या अन्यायाची त्यांना खूप चीड होती. अस्पृश्यतेबद्दल त्यांच्या मनात प्रचंड राग होता. अस्पृश्य समाजाला उच्च वर्णीयांकडून जी वागणूक दिली जात होती त्याबाबत त्यांच्या मनात प्रचंड असंतोष होता. अस्पृश्य समाजाला विहिरीचे पाणी दिले जात नाही हे पाहून त्यांनी विहिरीचे रहाटच तोडून टाकले होते. कर्मवीर भाऊराव पाटलांना शिक्षणाची खूप आवड होती. त्यांचे प्राथमिक शिक्षण कोल्हापूर जिल्ह्यातील विटा या गावी झाले तर माध्यमिक शिक्षण कोल्हापूरच्या राजाराम हायस्कूलमध्ये झाले. शालेय वयातच त्यांच्यावर छत्रपती शाहू महाराजांच्या विचारांचा प्रभाव पडला. छत्रपती शाहू महाराज व महात्मा ज्योतिराव फुले यांना ते आदर्श मानू लागले. शिक्षण पूर्ण झाल्यावर ते साताऱ्यात गेले तीथे त्यांनी गरीब मुलांसाठी शिकवण्या सुरू केल्या. याच काळात त्यांनी मद्वना मास्तर, भाऊसाहेब कुदळे, नानासाहेब येडेकर यांच्या मदतीने दुधगावत दुधगाव शिक्षण मंडळाची स्थापना केली. या संस्थेमार्फत गरीब मुलांसाठी एक वसतिगृह सुरू केले. ४ ऑक्टोबर १९१९ रोजी कर्मवीरांनी सातारा जिल्ह्यातील काले गावात रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. बहुजन समाजातील मुलांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण करून त्यांना मोफत व दर्जेदार शिक्षण देणे हे रयत शिक्षण संस्थेचे मुख्य उद्दिष्ट होते. बहुजन समाजातील गरीब मुलांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी अपार कष्ट घेतले. बहुजन समाजातील मुलांना केवळ पुस्तकी शिक्षण न देता त्यांनी त्यांना समता, बंधुता, श्रमप्रतिष्ठा, सामाजिक बांधिलकी आदी मूल्यांची देखील शिकवण दिली. संस्थेत शिक्षण घेणाऱ्या मुलांना साताऱ्यात राहण्याची सोय व्हावी म्हणून त्यांनी वसतिगृह बांधले. या वसतिगृहाची जबाबदारी त्यांनी पत्नी लक्ष्मीबाई यांच्यावर सोपवली. लक्ष्मीबाई या वसतिगृहातील मुलांसाठी मायेची सावली बनल्या. वसतिगृह चालवण्यासाठी त्यांना आपले दागिने विकावे लागले. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत संस्था आणि वसतिगृह चालवण्याचा प्रयोग कर्मवीरांना करता आला तो लक्ष्मीबाई यांच्यामुळेच. कर्मवीरांनी रयत शिक्षण संस्थेत कमवा आणि शिका योजना सुरू केली. या योजनेनुसार चालणारे पहिले फ्री अँड रेसिडेंशल हायस्कूल सातारा येथे सुरू करून त्या हायस्कूलला महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे नाव दिले. त्यानंतर याच नावाने त्यांनी अनेक शाळा काढल्या. १९४७ साली कर्मवीरांनी साताऱ्यात छत्रपती शिवाजी कॉलेज, तर १९५४ साली कराड येथे सदगुरु गाडगे महाराज कॉलेजची स्थापना केली. आपल्या संस्थेत प्रशिक्षित शिक्षकांचा वानवा पडू नये यासाठी त्यांनी अध्यापक विद्यालये देखील सुरू केली. भाऊराव पाटील यांच्या हयातीत रयत शिक्षण संस्थेने ५७८ प्राथमिक शाळा, ४३९ माध्यमिक शाळा, ( २७ मुलींसाठी ) ३८ वसतिगृह शाळा, १६0 उच्च माध्यमिक विद्यालये, २१ तंत्रदान विद्यालये, ८ अध्यापक विद्यालये, ( १ मुलींसाठी ) ४१ महाविद्यालये (४ मुलींसाठी ) आणि ५ इंग्रजी माध्यमांची विद्यालये यांची स्थापना केली. रयत शिक्षण संस्थेचा विस्तार महाराष्ट्रातच नाही तर कर्नाटकातही झालेला आहे. त्यांनी लावलेल्या रयत शिक्षण संस्थेच्या रोपट्याचा आज वटवृक्ष बनला आहे. बहुजन वर्गातील मुलांसाठी त्यांनी केलेले कार्य पाहून पुणे विद्यापीठाने १९५९ साली त्यांना डि. लीट ही मानाची पदवी बहाल केली. भारत सरकारनेही पद्मभूषण हा मानाचा पुरस्कार देऊन त्यांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव केला. बहुजन समाजापर्यंत शिक्षणाची गंगा पोहचवणाऱ्या या आधुनिक भगिरथाचे ९ मे १९५९ रोजी निधन झाले. आज त्यांची १३७ वि जयंती. आजच्या दिवशी त्यांचे स्मरण करून त्यांना अभिवादन करणे हे बहुजनांचे आद्य कर्तव्य आहे. कर्मवीर भाऊराव पाटलांना विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## रजनी देशमुख यांच्या स्मृतीनिमित्त वृक्षारोपण



**जालना -** जुना जालना भागातील बालाजी संस्थानच्या विश्वस्त स्व.रजनी प्रभाकरराव देशमुख यांच्या स्मृतीनिमित्त शनिवारी रामतीर्थ स्मशानभूमीमध्ये वृक्षारोपण करण्यात आले. यासाठी रामतीर्थ स्मशानभूमी स्टचे सदस्य तथा निवृत्त अभियंता एस.एन. कुलकर्णी यांनी पुढाकार घेतला. यावेळी प्रमुख उपस्थितांमध्ये ब्राह्मण सभेचे अध्यक्ष कल्याणराव देशपांडे, एम.जी.जोशी, रमेश देहेडकर, श्रीकांत शेलगावकर, आर.आर.जोशी, एलआयसीतील निवृत्त विकास अधिकारी पांडुरंग सांगळे, ज्येष्ठ पत्रकार राजेश भालेराव, विजयराव नाईक, अनिल लोखंडे, संजय देशमुख, त्र्यंबक देशमुख आदींची उपस्थिती होती. यावेळी कांचन या प्रजातीतील वृक्षाची लागवड करण्यात आली. एस.एन.कुलकर्णी यांनी यावेळी रामतीर्थ स्मशानभूमीत नव्याने सुरू असलेल्या विविध विकासकामांची माहिती दिली. कार्यक्रमात एम.जी.जोशी यांनी रजनी देशमुख यांच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला.

# स्वच्छता ही सवय बनावी -राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन

## आंतरराष्ट्रीय सागरी किनारा स्वच्छता दिनानिमित्त जुहू किनाऱ्यावर स्वच्छता अभियान

**मुंबई । प्रतिनिधी -** प्रत्येक मोठ्या कार्याची सुरुवात लहान लहान बाबींनी होत असते. सागरी किनारा स्वच्छतेसाठी आज जनजागृतीचा दिवस असून किनारा स्वच्छतेची ही सुरुवात मोठे रूप धारण करून 'स्वच्छ भारत, महान भारत' संकल्पनेला आकार देईल, असे प्रतिपादन राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी केले. तर, समुद्रकिनारे स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी प्रत्येकाची असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

सागरी किनारा स्वच्छतेबाबत जनजागृतीसाठी सप्टेंबर महिन्याच्या तिसऱ्या शनिवारी आंतरराष्ट्रीय सागरी किनारा स्वच्छता दिनाचे आयोजन केले जाते. या अनुषंगाने पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय व श्रम व रोजगार मंत्रालय, महाराष्ट्र शासन, बृहन्मुंबई महानगरपालिका, प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या सहकार्याने जुहू समुद्रकिनारा येथे समुद्रकिनारा स्वच्छता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

केंद्रीय वन आणि पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव, मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री दीपक केसरकर, मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, खासदार रवींद्र वायकर, आमदार अमित साटम, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम, केंद्रीय वन आणि पर्यावरण विभागाचे विशेष सचिव तन्मय कुमार, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त डॉ. अश्विनी जोशी, पर्यावरण आणि हवामान बदल विभागाचे प्रधान सचिव प्रविण दराडे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव डॉ. अविनाश ढाकणे आदी यावेळी उपस्थित होते.



स्वच्छता अभियानासाठी विद्यार्थ्यांची लक्षणीय उपस्थिती असल्याबद्दल समाधान व्यक्त करून राज्यपाल म्हणाले, तरुणांमध्ये स्वच्छतेबाबत होत असलेली जागृती ही सकारात्मक बाब आहे. सांडपाणी स्वच्छ आणि प्रक्रिया करूनच सागरात गेले पाहिजे तसेच सागर किनारे प्लास्टिक आणि कचऱ्यापासून मुक्त करणे हे आमचे उद्दिष्ट आहे. निसर्गाने आपल्याला दिलेली प्रत्येक गोष्ट स्वच्छ स्वरूपातच निसर्गाला परत दिली पाहिजे, असे सांगून सिंगल युज प्लास्टिकचा वापर बंद करण्याच्या केंद्र सरकारच्या अभियानात राज्याचे पूर्ण सहकार्य असेल, असेही राज्यपालांनी यावेळी सांगितले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशभरात स्वच्छ भारत अभियान सुरू केले आहे. राज्यातही 'स्वच्छता ही सेवा' पंधरवड्याचा नुकताच शुभारंभ झाला असून राज्यात ४५00 ठिकाणी हे अभियान राबविण्यात येत आहे. राज्यातील ७२0 किलोमीटर लांबीच्या किनापट्टीमध्ये नैसर्गिक सौंदर्य लाभलेले अनेक समुद्रकिनारे आहेत. जगभरातील पर्यटक देखील स्वच्छ किनाऱ्यांना पसंती देतात. हे किनारे स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी आपली प्रत्येकाची आहे. मुंबईत सखोल स्वच्छता अभियान राबविण्यात येत आहे, पावसाळ्यानंतर ते नियमित सुरू राहणार असल्याचे सांगून यामुळे प्रदूषणात मोठी घट झाल्याचे त्यांनी नमूद केले. मुंबई हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर आहे, शासनाच्या सर्व यंत्रणा, सामाजिक संस्था आणि नागरिकांच्या एकत्रित सहभागातून हे शहर आणि समुद्र किनारे स्वच्छ ठेवूया, असे आवाहन त्यांनी या निमित्ताने केले. यावेळी मुख्यमंत्र्यांनी उपस्थितांना स्वच्छतेची शपथ दिली.

केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव म्हणाले, समुद्रकिनाऱ्यांच्या स्वच्छतेसाठी जगभर जागृती अभियान राबविले जात आहे. देशात स्वच्छता पंधरवडा राबविण्यात येत असून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या मिशन लाईफ या संकल्पनेतील स्वच्छ भारत बनविण्यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न करूया, असे आवाहन त्यांनी केले. पंतप्रधानांच्या 'एक पेड मा के नाम' या उपक्रमात सहभागी होऊन सर्वांनी किमान एक झाड लावावे, असे त्यांनी सांगितले. पाण्याच्या पुनर्प्रक्रिया करणाऱ्या स्टार्टअपसाठी केंद्र सरकारमार्फत मदत दिली जाणार असल्याचे त्यांनी यावेळी जाहीर केले.

प्रधान सचिव श्री. दराडे यांनी समुद्र किनारा स्वच्छतेबाबत माहिती देऊन मुंबईतील सर्व चौपाट्या बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत आधुनिक यंत्रसामग्रीच्या माध्यमातून स्वच्छ केल्या जात असल्याचे सांगितले. तर तन्मय कुमार यांनी केंद्र सरकार मार्फत केल्या जात असलेल्या उपाययोजनांबाबत माहिती दिली. मान्यवरांच्या हस्ते यावेळी किनारा स्वच्छतेबाबत केंद्र सरकारच्या मार्गदर्शक तत्वांच्या पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. श्री. ढाकणे यांनी या अभियानात सहभागी सर्वांचे आभार व्यक्त केले.

राज्यपाल, मुख्यमंत्री यांच्यासह मान्यवर, सामाजिक संस्था, विद्यार्थी, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे कर्मचारी आदींनी यावेळी आधुनिक सामग्रीच्या साहाय्याने जुहू किनाऱ्याची स्वच्छता केली.

## पान १ वरुन

### केंद्र व राज्य ...

२४ बीटीई श्रवणयंत्र, २७ कृत्रिम हातपाय, असे एकूण ४५५ नग साहित्य २६९ लाभार्थ्यांना वाटप करण्यात आले

दिव्यांग नागरिकांना सर्वसामान्य नागरिकांच्या तुलनेत मिळणाऱ्या सोयी सुविधांकडे दुर्लक्ष केले जातं असं असताना आता यात माजीमंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी मंठा शहरांमध्ये महत्वपूर्ण कार्यक्रम आयोजित करून त्या ठिकाणी दिव्यांग बांधवांना आवश्यक त्या साहित्यांचे वाटप करण्यात आले. त्यामध्ये सर्व प्रकारच्या दिव्यांग बांधवांसाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. वर्षभरापूर्वी ग्रामीण रुग्णालय मंठा येथे दिव्यांग बांधवांच्या मेळाव्याप्रसंगी तपासणी शिबिर आयोजित करून या दिव्यांग बांधवांना कोणत्या प्रकारच्या साहित्याची आवश्यकता आहे या संदर्भातील तपासणी करण्यात आली होत त्या तपासणीनुसार या कार्यक्रमात २६९ दिव्यांग बांधवांनी सहभाग घेतला होता

यावेळी बोलताना श्री लोणीकर म्हणाले की विधिमंडळातील माझे सहकारी मित्र आमदार श्री बच्चू कडू यांनी देखील दिव्यांग बांधवांच्या दृष्टिकोनातून अत्यंत मोलाचं काम केलं असून पक्ष वेगळे असले तरी काम करणाऱ्या व्यक्तीचं कौतुक निश्चितपणे आपण केलं पाहिजे अशा शब्दात आमदार बच्चू कडूंच्या कार्याचा गौरव आमदार लोणीकरांनी केला दिव्यांग बांधवांना कर्ज उपलब्ध करून देण्यापासून विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी आपण देखील आपल्या मतदारसंघांमध्ये सातत्याने प्रयत्नशील असून या निमित्ताने दिव्यांग बांधवांची सेवा करण्याचे भाग्य मला लाभलं याचं मला समाधान आहे असेही यावेळी लोणीकर म्हणाले

यावेळी गणेशराव खवणे, सतिशराव निर्वळ, राजेश मोरे, पंजाबराव बोराडे, कैलास बोराडे, नागेश घारे, विलास घोडके, दीपक बोराडे, शेषनारायण दवणे, सौ यमुना दवणे, तहसीलदार सोनाली जोंधळे, गटविकास अधिकारी गगनबोने, श्री बेहरा, पोलीस निरीक्षक निकाळजे, माऊली गोंडगे, राजेभाऊ खराबे, बाबाजी जाधव, गुलाब राठोड, प्रल्हादराव सरकटे बंडू नाना खरात अशोकअप्पा सोनटक्के, सोपानराव खरात, गणेशराव चव्हाळ, जानकीराम चव्हाण, जयश्री पवार, परमेश्वर शिंदे, शरद पाटील, भगवान देशमुख, तौफिक कुरेशी, दिनेश सराफ, शेख रहीम, अभिजात कोदंडे, श्रीदेव खरात, पवन रेंगे, शंकर फड यांच्यासह अनेक मान्यवर व दिव्यांग बांधव व त्यांचे कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### वरखेड सि...

संजय वाघ, तुकाराम खर्जुले, विभाग प्रमुख सचिन देशमुख आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी शिवसेना उपनेते अर्जुनराव खोतकर यांनी प्रवेश कर्त्यांचे शिवसेना पक्षात प्रवेश केल्याबद्दल शाल व पस्पहार घालून स्वागत करून सर्वांचे आभार व्यक्त केले व त्यांना शुभेच्छा दिल्या .

यावेळी गावातील अशोक आप्पा काटकर, गीताराम तिडके, बाळासाहेब जाधव, शिवाजी जाधव, नितीन जोगदंड, जालिंदर जोगदंड, गणेश शेवाळे, सखाराम लंके वैजीनाथ परळकर नजीर भाई, आधीची प्रमुख उपस्थिती होती.

### इनरव्हील होरायझनतर्फे ...

त्याची काळजी घेणे आपली प्राथमिक जबाबदारी असल्याचे हे संदेश अधोरेखित करतात. त्यासाठी ट्रॅकवर ठीकठिकाणी २८ संदेश फलक लावून त्यातून सुदृढ आरोग्याचे महत्व पटवून देण्यात आले आहे. या उपक्रमाचा शुभारंभ पांजरापोळचे विश्वस्त महिंद्रप्रसाद भक्कड, विजयकुमार कामड, उद्योजक शंकर शर्मा यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी क्लबच्या सचिव ड. पिंकी लड्डा, आरती भक्कड, वैष्णवी मिसाळ, पुनम अग्रवाल, उर्वशी खंडेलवाल आदींची उपस्थिती होती.

यावेळी महेंद्रप्रसाद भक्कड म्हणाले की, प्रत्येकाने आपल्या सुदृढ आरोग्यासाठी जागरूक राहिले पाहिजे. त्यासाठी दररोज व्यायाम केला पाहिजे. दररोज ट्रॅकवर येऊन व्यायाम केला पाहिजे. ईन्नरव्हील होरायझनतर्फे संदेश फलक लावून आरोग्यविषयक जनजागृती चा उपक्रम अत्यंत स्तुत्य असल्याचे ते म्हणाले. क्लबच्या सचिव ड. पिंकी लड्डा म्हणाल्या की, आपण या वयातच आरोग्याला जपले तर भविष्यात आरोग्य आपल्याकडे लक्ष देईल आणि आपले जीवन आनंदीमयी आणि सुखदायी राहील. हाच उद्देश समोर ठेवून जॉगिंग ट्रॅक वर संदेश फलक लावण्याचा उपक्रम आम्ही राबविल्याचे त्यांनी सांगितले.

### लायन्स क्लबतर्फे ...

आणि ६५ वेळा रक्तदान करणारे अतुल लड्डा यांचा यावेळी विशेष सत्कार करण्यात आला. गेल्या ३0 वर्षांपासून सतत कार्यरत असलेली जनकल्याण रक्त पेढी समाजासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण कार्य करत आहे. त्याबद्दल यावेळी या पेढीच्या सर्व कर्मचाऱ्यांचे आभार व्यक्त करण्यात आले. शिबिरातील उपस्थितांना रक्तदानाचे महत्त्व पटवून देण्यात आले. एका व्यक्तीच्या रक्तदानामुळे तीन लोकांचे प्राण वाचू शकतात. थॅलेसीमियासारख्या गंभीर आजारांनी त्रस्त असलेल्या मुलांना नियमितपणे रक्ताची गरज असते आणि अशा परिस्थितीत रक्तदान त्यांच्यासाठी जीवनरेखा ठरते. याशिवाय, रक्तदानामुळे रक्तदात्याच्या आरोग्याला काहीही हानी होत नाही, उलट शरीरासाठी ते फायदेशीर ठरते. त्यामुळे प्रत्येकानेया पवित्र कार्यात सक्रिय सहभाग नोंदवावा आणि समाजात सकारात्मक बदल घडवावा, असे आवाहन लायन्स क्लबच्यावतीने करण्यात आले आहे.

### भाजपा जालना ...

मंडळ शिवराज केशवराव जाधव, कसबा मंडळ ज्ञानेश्वर रावसाहेब ढोबळे, बाजारपेठ मंडळ प्रमोद कमलाकरराव गंडाळ, रामनगर मंडळ सतीश सुरेशराव जाधव, गांधीचमन मंडळ शशिकांत रामकृष्ण घुगे, भाग्यनगर-शिवनगर मंडळ महेश विष्णू निकम, आनंदवाडी मंडळ प्रभुलाल नारायणजी गोमतीवाले, अंबडरोड मंडळ प्रा.राजेंद्र संपतराव भोसले यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

भाजपा जालना महानगराध्यक्ष अशोक आण्णा पांगारकर यांच्यासह जालना महानगर प्रभारी पदी श्री.सिद्धिविनायक वसंतराव मुळे तसेच भाजपा जालना महानगर उपाध्यक्ष पदी श्री.चंपालाल छोटेलाल भगत, श्री.सुहास विजयकुमार मुंढे, श्री.योगेश लहाने, श्री.दुर्गेश रतनलाल कुरील, सौ.रुख्मीनी सुभाष पवार, श्री.महेंद्र अकोले, श्री.ज्ञानेश्वर रावसाहेब ढोबळे, श्री.राजू गवई, श्री.चेतन देसरडा, श्री.शशिकांत रामकृष्ण घुगे, श्री.लक्ष्मण वर्मा, श्री.सुनील रुपा पहेलवान खरे, श्री.सुनील मोहनलाल राठी यांची जालना महानगराच्या उपाध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली आहे.

भाजपा जालना महानगर सरचिटणीस पदी शिवराज केशवराव जाधव, महेश निकम, अमोल दत्तात्रय कारंजेकर, सुनील सुभाष पवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

भाजपा जालना महानगर चिटणीस पदी श्री.किरण लालासाहेब इंगळे, सौ.लक्ष्मीबाई अशोक लहाने, श्री.शांतीलाल राऊत, श्री.गोविंद बालकिसन चिलवर, श्री.सतिष अकोलकर, श्री.नेमीचंद भूरेवाल, श्री.मनोज इंगळे, श्री.शेखर बुंदिले, रणजित राजपाल रिडला यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

भाजपा जालना महानगर सोशल मिडिया प्रमुख पदी श्री.मनोज दाविदराव बिडकर, कोषाध्यक्ष पदी श्री.राहुल किशोर अग्रवाल व प्रसिध्दीप्रमुख श्री.नागेश बेनीवाल यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

भाजपा जालना महानगर मोर्चा अध्यक्ष पदी युवा मोर्चा अध्यक्ष श्री.अमोल धानुरे, महिला मोर्चा अध्यक्षा सौ.शुंभागी श्रीकांत देशपांडे, ओबीसी मोर्चा अध्यक्ष श्री.सोमेश चुन्नुलाल काबलिये, अनुसूचित जाती मोर्चा अध्यक्ष श्री.अभिजीत अंभोरे, अल्पसंख्यांक मोर्चा अध्यक्ष श्री.सय्यद इम्रान अली, अनुसूचित जाती जमाती मोर्चा अध्यक्ष श्री.डोंगरसिंग भावडू साबळे, किसान मोर्चा अध्यक्ष श्री.प्रशांत गाडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

भाजपा जालना महानगर प्रकोष्ठ व सेल च्या अध्यक्ष पदी कामगार आघाडी संयोजक माणिक फड, उद्योग आघाडी संयोजक अविनाश देशपांडे, व्यापार आघाडी संयोजक मनोज पाचफुले, उत्तर भारतीय आघाडी संयोजक अशोक मिश्रा, वैदकिय सेल संयोजक गोविंद भताने, कायदा सेल संयोजक राहुल प्रल्हादराव इंगोले, सहकार सेल संयोजक गणेश धारूरकर, सोशल मिडीया संयोजक मनोज दावीदराव बिडकर, जेष्ठ कार्यकर्ता सेल संयोजक प्रभुलालजी नारायणजी गोमतीवाले, दिव्यांग सेल संयोजक नितीन देव, शिक्षक सेल संयोजक अतुल हेलसकर, जैन प्रकोष्ठ संयोजक राजेश चंदुलाल बांठीया, आयुष्यमान भारत सेल संयोजक लक्ष्मण नामदेवराव खाडे, बेटी बचाओ-बेटी पढाओ संयोजक सौ.सुनिता अर्जुन जाधव, फेंन्डस ऑफ बीजेपी सेल संयोजक धिरज केसरीलाल मेवाडे, मन की बात सेल संयोजक धनराज मोहनलाल काबलिये, सेवाभावी संस्था (एनजीओ) सेल संयोजक विश्वनाथ क्षीरसागर, दक्षिण भारतीय सेल संयोजक योगेश परशुराम सामलेटी, बुद्धीजीवी सेल संयोजक पदी डॉ.पवन लक्ष्मीकांत देशमुख यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

भाजपा जालना महानगर जिल्हा कार्यकारिणी सदस्य पदी श्री.रोषण जयसिंग चौधरी, सौ.सरिता महेंद्र अकोले, श्रीधर प्रभाकर देशपांडे, श्री.योगेश विश्वनाथ नागरे, श्री.पंकज किल्लेदार, श्री.देविदास अंबादास जाधव, श्री.अमोल अरुण खडके, श्री.विवेक नारायण पाटील, श्री.हरीभाऊ बाबुराव नाटकर, श्री.राजेश किसनराव बाबरेकर, श्री.सचिन राजेश्वर सासवडे, श्री.प्रेमनारायण मच्छिंद्र काळे, श्री.देविदास विश्वनाथ तिळवणे, श्री.विजय वनगुजर, श्री.विजय पांगारकर, श्री.करण फुलचंद झाडीवाले, श्री.गौरव मनोज गोधेकर, श्री.गणेश भालेराव, श्री.निलेश गवळी, श्री.मुकेश राठोड, श्री.गणेश जल्लेवार, श्री.रोहित नलावडे, श्री.संतोष काळे, श्री.सुरज पणबिसरे, श्री.लखन ठाकूर, श्री.सुरेंद्र शेडूते, श्री.सेवक नारीयलवाले, श्री.प्रकाश जायभाये, श्री.संतोष वाघ, श्री.गोपाल गोमतीवाले, श्री.बबनराव उजेड, श्री.पवन शांतीलाल झुंगे, श्री.संतोष औरंगे, सौ.वैशाली बनसोडे, सौ.ममता गोपाल कोंड्याल, सौ.वर्षा शंकरसिंग ठाकूर, श्री.जगदीश नरसय्या येनगुपटला, श्री.अथर्व कुलकर्णी, श्री.अमोल बाबुराव भवर, श्री.उमेश सोपान पेंढारकर, श्रीमती स्नेहा राजेश जोशी यांची भाजपा जालना महानगर जिल्हा कार्यकारिणी सदस्य पदी नियुक्ती करण्यात आली आहे.

यावेळी भाजपा नवनिर्वाचीत पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करतांना जालना विधानसभा प्रमुख भास्कर आबा दानवे म्हणाले की, आपण जालना महानगरातील पक्ष संघटने करीता अनेक लोकउपयोगी कामे करुन जनतेमध्ये आपला ठसा उमटवित आहात तसेच यापुर्वी पक्ष संघटनेच्या बळकटीसाठी केलेले कार्य उत्तम आहे.केंद्र व राज्य शासनाच्या जनकल्याणकारी योजना सामान्य जनतेपर्यंत पोहचविण्याचे काम व विकास कामे आपणास दिलेल्या पक्षाच्या जबाबदारीतुन जनतेला समजावून सांगावे असे म्हटले आहे.

यावेळी भाजपा नवनिर्वाचीत पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करतांना जालना महानगराध्यक्ष अशोक आण्णा पांगारकर म्हणाले की, जालना महानगरातील दहा मंडळातील अध्यक्ष, प्रभारी व पदाधिकाऱ्यानी सर्व २२४ बूथ पर्यंत भारतीय जनता पार्टीचे संघटन बांधणी करून येणाऱ्या निवडणुकांच्या तयारी साठी कामाला लागावे व पक्षाचे काम करीत असताना जनहिताचे कामे करावेत व शासनाच्या सर्व योजना सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचवाव्यात असे त्यांनी सांगितले.

यावेळी प्रमुख उपस्थिती प्रदेश निमंत्रित सदस्य रामेश्वर भांदरगे, जिल्हा सरचिटणीस सिद्धिविनायक मुळे, महिला मोर्चा जिल्हाध्यक्षा सौ.संध्याताई देठे, प्रदेश निमंत्रित सदस्य विजय कामड, तालुकाध्यक्ष वंसतराव शिंदे, वैशाली बनसोडे भाजपा चे सर्व नगरसेवक व पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शालेय विद्यार्थ्यांसाठी महावीर स्वामी जीवन चरित्रावर निबंध स्पर्धेचे आयोजन

## ३० सप्टेंबरपर्यंत निबंध ई-मेलवर वर पाठवावे - विरेंद्र रुणवाल

**जालना । प्रतिनिधी -** प्रभू महावीर स्वामी यांच्या २५५० व्या निर्वानोत्सव वर्ष उजवनीनिमित्त महाराष्ट्र शासनाचा सांस्कृतिक कार्य विभाग, श्री भगवान महावीर स्वामी निर्वाण महोत्सव समितीच्यावतीने भगवान महावीर यांच्या जीवन चरित्रावर शालेय विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेसाठी राज्यस्तरावर २५ लाख ५० हजाराचे पारितोषिक दिले जाणार आहे. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून २० ते ३० सप्टेंबरदरम्यान आपले निबंध लिहून सादर करावेत, असे आवाहन जालना जिल्हास्तरीय भगवान महावीर स्वामी निर्वाण कल्याणक महोत्सव समितीच्यावतीने करण्यात आले आहे.

महाराष्ट्रातील संपूर्ण ३६ जिल्ह्यातील सरकारी, निमसरकारी आणि खाजगी अशा एकूण १ लाख शाळेतील दीड कोटी विद्यार्थ्यांसाठी महावीर स्वामी यांच्या जीवन चरित्रावर आधारित राज्यस्तरीय निबंध होणार आहे. या स्पर्धेसाठी राज्यस्तरावर पहिल्या गटासाठी प्रथम पारितोषिक ३ लाख ३३ हजार ३३३ द्वितीय पारितोषिक २ लाख २२ हजार २२२ आणि तृतीय पारितोषिक १ लाख ११ हजार १११, दुसऱ्या गटासाठी प्रथम पारितोषिक ४ लाख ४४ हजार ४४४, द्वितीय पारितोषिक २ लाख २२ हजार २२२२ तर तृतीय पारितोषिक १ लाख ११ हजार १११ रुपये ठेवण्यात आले आहे. जिल्हास्तरावर पहिल्या गटासाठी प्रथम पारितोषिक ५ हजार ५५५, द्वितीय पारितोषिक ३हजार ३३३, तृतीय पारितोषिक २ हजार २२२, चौथे पारितोषिक १ हजार १११, पाचवे पारितोषिक ५५१ रुपये, दुसऱ्या गटासाठी प्रथम पारितोषिक ५ हजार ५५५, द्वितीय पारितोषिक ३ हजार ३३३, तृतीय पारितोषिक, २ हजार २२२, तृतीय पारितोषिक १ हजार १११आणि पाचवे बक्षीस ५५१ रुपयाचे दिले जाणार आहे.

या स्पर्धेत इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना सहभागी होता येणार आहे. अंदाजे ५०० शब्दात किमान दोन पाने निबंध इंग्रजी, मराठी, हिंदी आणि गुजराती भाषेत लिहावयाचा आहे. निबंधाच्या शेवटी विद्यार्थ्याचे नाव, वर्ग वय, मुख्याध्यापकाचे नाव, त्यांचा मोबाईल क्रमांक, शाळेचे नाव शाळेचा ईमेल आयडी, शहर, गाव, तालुका त्यावर नमूद करावे. भगवान महावीर स्वामी जीवन चरित्र विद्यार्थ्यांना स्पर्धेच्या २ दिवस आधी दिले जाईल. शाळेच्या देखरेखीखाली निबंध लिहावयाचा असून, इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांना निबंध लेखनासाठी दीड तास आणि इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना १ तास दिला जाईल. आपले निबंध २० ते ३० सप्टेंबर या काळात शिक्षक अथवा शाळेकडून पडताळणी करून ३० सप्टेंबरपर्यंत जिल्हास्तरीय समितीकडे पाठवावा. शाळेने सर्व निबंधांवर स्वाक्षरी आणि शिक्का मारल्यानंतर, मुख्याध्यापक पर्ळीींरपझरश्रूरपरज्ञक्षरश्रपरसारळश्र.लो या ई-मेलवर ३ ऑक्टोबपर्यंत हे निबंध पाठवतील. शिक्षक अथवा शाळेद्वारे प्रमाणित या निबंधाची प्रत जिल्हास्तरीय समितीकडे ३० सप्टेंबरपर्यंत सुपूर्द करणे गरजेचे आहे.

जालना जिल्ह्यातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी निबंध स्पर्धेत सहभाग नोंदवावा, असे आवाहन भगवान महावीर स्वामी निर्वाण कल्याणक महोत्सव समितीचे राज्यस्तरिय अध्यक्ष तथा कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगकप्रभात लोढ़ा, हितेश मोता, ललित गांधी, संदीप भंड़ारी व जालना जिल्हास्तरीय समितीचे सुदेश सकलेचा, वीरेंद्र रुणवाल, प्रमोद देसरडा, संजय लव्हाडे, ड. अनिल संचेती, अशोक संचेती यांनी केले आहे.

# जालना येथील सायकल वीर वैष्णव देवीकडे रवाना

**जालना । प्रतिनिधी -** जालना येथील सायकल वीर वैष्णव देवीच्या दर्शनाला रवाना होणाऱ्या सायकल वीरांना बहुजन समाज पार्टी जालना विधानसभातर्फे शाल व बिस्कीट देऊन सन्मान करण्यात आले. श्री ग्वालेश्वर ग्रुप जालनाच्या वतीने गेल्या ३५ वर्षांपासून वैष्णव देवीच्या दर्शनासाठी जात आहेत. जालन्यातून वैष्णवी देवी जाण्यासाठी १८ दिवस लागत असून २३०० किलोमीटर अंतराचा टप्पा सायकलवर पार करतात. हे सायकल स्वार ६ राज्यातून, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, दिल्ली, पंजाब, जम्मू कश्मीर या मार्गाने वैष्णव देवी येथे पोहचतात.

जालना शहरातील पाच भाविक भूषण विजय सेनानी, युवराज राजपूत, अर्जुन फतेलष्करी, उदय उपासे अक्षय राठोड, हे जम्मू कश्मीर मधील आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध असलेले माँ वैष्णोदेवीच्या दर्शनासाठी रवाना झाले आहेत. देऊळगाव राजा शहरातील आमना नदीवर या पाच भाविकांचा सन्मान जालना बहुजन समाज पार्टीचे विधानसभा अध्यक्ष राहुल करनाडे, समाजसेवक पै. रतन गोमतीवाले, विजय भगत, पै. भरतानंद भक्त यांच्या हस्ते व देवलगाव राजा शहरातील प्रसिद्ध व्यापारी दीपक मल्लावत जायंटस वेलफेअर फाऊंडेशनचे सन्मती जैन, जुगलकिशोर हरकुट यांच्या हस्ते पुष्पहार घालुन स्वागत करण्यात आले.

या भक्तांचा उत्साह वाढवण्यासाठी यावेळी अनेक भक्तगण उपस्थित होते. यामध्ये मोहनलाल फतेलष्करी, गणेश भुरेवाल, राहुल भगत, शुभम भुरेवाल, किशोर फतेलष्करी, संतोष राजपूत, उपस्थित होते हे भाविक दररोज शंभर ते १२० किलोमीटर सायकल चालावणार आहेत येताना हे सर्व भाविक रेल्वेने परत येणार आहेत त्याांच्या या मार्गातील व्यवस्थेसाठी त्यांचे मित्रमंडळ त्यांना पूर्ण सहकार्य करीत आहेत. पर्यावरण संतुलनासाठी व निरोगी आयुष्य जगण्यासाठी आम्हीं नेहमीच सायकल चालवितो असे या भक्तांनी सांगून ज्यांना ज्यांना शक्य आहे त्यांनी दररोज किमान पाच ते दहा किलोमीटर सायकल चालवावी, असा संदेश त्यांनी नागरिकांना दिला आहे.



# गर्भ लिंग निदान व गर्भपात प्रकरणातील आखणी एक आरोपी पुणे येथून अटकेत

## जालना स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**भोकरदन । प्रतिनिधी -** येथील डॉ. राजपुत व इतर यांचे विरुध्द गर्भ लिंग निदान व गर्भपात संबंधी पोलीस ठाणे भोकरदन येथे गुन्हा दाखल असून, सदर गुन्ह्याचा तपास स्थानिक गुन्हे शाखा जालना हे करीत आहे. सदर प्रकरणात यापुर्वी स्थानिक गुन्हे शाखा जालना येथील पथकाने मुख्य आरोपी डॉ. दिलीपसिंग राजपुत यास अटक केली असुन तो सध्या जिल्हा मध्यवर्ती कारागृहात आहे. सदर प्रकरणातील फरार आरोपी किशोर ऊर्फ बाळु उत्तम मोहिते रा. पंढरपुरवाडी ता. भोकरदन हा मागील काही दिवसापासुन पुणे शहर व पिंपरी चिंचवड शहराचे परिसरात काम करीत असल्याची माहिती पोलीस निरीक्षक पंकज जाधव स्थागुशा जालना यांना मिळाली. त्या आधारे स्थागुशा येथील एक पथक पुणे व पिंपरी शहरात सतत चार दिवस आरोपीताचा शोध घेत असतांना आरोपी किशोर ऊर्फ बाळु उत्तम मोहिते हा पिंपरी चिंचवड येथील एक गॅरेज वर काम करीत असल्याची माहिती मिळाली. त्या अनुषंगाने आरोपी हिंजवडी परिरात मिळुन आल्याने त्यास दिनांक १४/०९/२०२४ रोजी अटक करण्यात आली आहे. सदर आरोपीस पोलीस कोठडी नंतर त्यास जिल्हा मध्यवर्ती कारागृहात रवाना करण्यात आले आहे. दि.२० शुक्रवार रोजी दुपारी तिन वा.च्या सुमारास पोलीस प्रशासनाच्या वतीने प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळवण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल व मा. अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, सपोनि योगेश उबाळे, पोलीस अंमलदार कृष्णा तंगे, प्रशांत लोखंडे, योगेश सहाने धिरज भोसले सर्व स्थागुशा यांनी केली आहे.



# रोटरी मिड टाऊनमार्फत महात्मा फुले विद्यालयास वॉटर फिल्टर भेट

**घनसावंगी । प्रतिनिधी -** तालुक्यातील पानेवाडी येथील महात्मा फुले विद्यालयात रोटरी क्लब ऑफ जालना (मिड टाऊन) यांच्यामार्फत वॉटर फिल्टरची भेट देण्यात आली. यावेळी रोटरी क्लब ऑफ जालना (मिड टाऊन) चे पदाधिकारी सागर दक्षिणी (अध्यक्ष), गौरव मोदी (सचिव), अनुप करवा (जिल्हा अनुदान अध्यक्ष), व महात्मा फुले शिक्षण संस्थेचे संस्थापक सचिव आत्माराम तिडके उपस्थित होते. विद्यालयाचे मुख्याध्यापक अमोल तिडके, पर्यवेक्षक एस. एस. गोसावी यांनी सर्व पदाधिकाऱ्यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक एन. आर. माटे व सूत्रसंचलन आर. ए. आंधळे यांनी केले. या कार्यक्रमास शाळेतील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ईन्नरव्हील क्लब जालना होरायझनतर्फे २५० विद्यार्थ्यांची मोफत दंत तपासणी



**जालना । प्रतिनिधी -** ईन्नरव्हील क्लब ऑफ जालना होरायझनतर्फे १८ सप्टेंबर रोजी येथील शिवनगर भागातील अहिल्यादेवी माध्यमिक विद्यालयातील पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी मोफत दंत तपासणी शिबिर घेण्यात आले. २५० विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात येऊन दंतदोष आढळलेल्यांना मार्गदर्शन करण्यात येऊन, विद्यार्थ्यांना १०१ डेंटल किट वाटप करण्यात आल्या.

या शिबिराचा शुभारंभ अहिल्यादेवी विद्यालयाच्या अध्यक्ष सौ. शोभाताई येवले यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी संस्थेचे सचिव दिनेश येवले, मुख्याध्यापिका स्वाती इंगळे, क्लबच्या सचिव ड. पिंकी लड्डा, पुनम खंडेलवाल, अमृता मिश्रीकोटकर, सुहाना रोहरा, निकिता खंडेलवाल यांची उपस्थिती होती.

याप्रसंगी सदस्य आणि विवेकानंद हॉस्पिटलच्या दंतरोग तज्ञ डॉ. दिया डेम्बडा आणि त्यांच्या टीमने २५० विद्यार्थ्यांची दंत तपासणी केली. काही विद्यार्थ्यांमध्ये दंतदोष आढळून आले. त्यांना मार्गदर्शन करण्यात येऊन, उपचाराबाबत माहिती देण्यात आली. दंत आरोग्य हे पचनसंस्थेशी अवलंबून असते. त्यामुळे दाताची काळजी कशी घ्यावी, याबाबत त्यांनी सखोल मार्गदर्शन केले. यावेळी विद्यालयाचे शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थित होती. क्लबच्यावतीने विद्यार्थ्यांना टूथ ब्रश आणि पेस्ट यांचा समावेश असलेल्या १०१ किटस वाटप करण्यात आला. प्रास्ताविकपर भाषणात सचिव ड. पिंकी लड्डा यांनी या शिबिराचा उद्देश विषद करून, अशा प्रकारची शिबिर यापुढेही घेतली जातील, असे सांगितले.

## दूरदृश्यप्रणालीच्या माध्यमातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आर्य चाणक्य कौशल्य विकास केंद्राचे उद्घाटन

# युवक युवतींना रोजगारक्षम बनविण्याच्या दृष्टीने आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र या योजनेची अंमलबजावणी - लोणीकर

**परतूर । प्रतिनिधी-** नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० मध्ये व्यावसायिक शिक्षणाला महत्व देण्यात आलेले आहे. धोरणाच्या अंमलबजावणीला सकारात्मक वातावरण निर्मिती होण्यासाठी तसेच, युवक-युवतींना कौशल्य विकासाची संधी महाविद्यालयामध्ये उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र ही नाविन्यपूर्ण योजना सुरु केली आहे. असे प्रतिपादन माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी केले

सेवली येथील लोकमान्य टिळक महाविद्यालयामध्ये आर्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र ही नाविन्यपूर्ण योजना सुरू करण्यात आली असून दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी या कौशल्य विकास केंद्राचे उद्घाटन केले प्रसंगी आमदार श्री बबनराव लोणीकर बोलत होते पुढे बोलताना श्री लोणीकर म्हणाले की या कौशल विकास केंद्रामध्ये मेकअप आर्टिस्ट आणि डीटीपी कम्प्युटर टायपिंग या २ कोर्सला मंजुरी देण्यात आली आहे त्यामुळे युवक आणि युवतींना रोजगाराची संधी उपलब्ध होण्यासाठी आवश्यक ते कौशल्य या माध्यमातून विकसित केले जाणार आहे. राज्यातील नामांकित महाविद्यालयांमध्ये कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्र स्थापन करून १५ ते ४५ वयोगटातील युवक-युवतींना कौशल्य विकास प्रशिक्षण प्रदान करून, त्यांना आपल्या पायावर उभे राहण्यासाठी रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध करून देण्याचा पंतप्रधान नरेंद्र मोदी मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री अजित पवार, कौशल्य. रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंगल प्रभात लोढा यांचा व राज्यातील महायुती सरकारचा मानस आहे. असेही लोणीकर यांनी यावेळी स्पष्ट केले कौशल्य विकास या संकल्पनेचा अधिकाधिक लाभ राज्यातील युवक युवतींना व्हावा, या दृष्टिकोनातून राज्यामधील नामांकित महाविद्यालयांमध्ये कौशल्य विकास केंद्र स्थापन करून महाविद्यालयीन युवक युवतींना रोजगारक्षम बनविण्याच्या दृष्टीने विभागामार्फत आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र या योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे. असेही लोणीकरांनी यावेळी सांगितले.

## अंबड येथे घडलेल्या बस अपघाताची घटना दुर्दैवी

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे घटनेवर लक्ष ठेवून

## शिवसेना नेते माजी मंत्री अर्जुन खोतकर यांची माहिती



**जालना । प्रतिनिधी -** अंबड येथे घडलेल्या बस अपघाताची घटना दुर्दैवी असल्याची प्रतिक्रिया शिवसेना नेते माजी मंत्री अर्जुन खोतकर यांनी दिलीय. सकाळच्या सुमारास जालना जिल्ह्यातील मठ तांडा गावाजवळ बस आणि आयशर ट्रकचा अपघात होऊन ६ जण जागीच ठार झाले. तर एका प्रवाशाची प्रकृती चिंताजनक आहे. बस अपघातातील जखमी प्रवाशांची शिवसेना नेते माजी मंत्री अर्जुन खोतकर यांनी जिल्हा सामान्य रुग्णालयात जाऊन भेट घेतलीय. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे घटनेवर लक्ष ठेवून आहेत असं सांगत ते पूर्णपणे रुग्णांना मदत करणार असल्याचं खोतकर म्हणालेत. यावेळी खोतकर यांनी रुग्णालयात जाऊन अपघातग्रस्तांची भेट घेऊन त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केलीय. तसेच रुग्णांना योग्य ते वैद्यकीय उपचार देण्याच्या सूचना खोतकर यांनी आरोग्य प्रशासनाला केल्या आहेत.यावेळी जिल्हा शालेय चिकित्सक राजेंद्र पाटील आर आर गाडेकर शिवसेना संपर्कप्रमुख पंडित भुतेकर मेघराज चौधरी सरपंच राहुल गवारे आदींची उपस्थिती होती.

# पोस्को महाराष्ट्र स्टील आयोजित शेतकरी पत्रकार परिसंवाद कार्यक्रमात ज्ञानेश्वर बोडके यांचे नैसर्गिक शाश्वत सेंद्रिय शेती या विषयावर मार्गदर्शन

**बोरघर । माणगाव । प्रतिनिधी -** पोस्कोचा त्रैमासिक पत्रकार संवाद गुरुवार दिनांक १९-०९-२०२४ रोजी कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमातील विशेष अतिथी / वक्ता ज्ञानेश्वर बोडके हे होते, जे नैसर्गिक शेतीतील तज्ञ असून अभिनव फार्मर्स क्लब या संस्थेचे संस्थापक आहेत, या मुळेच या संवाद कार्यक्रमात पोस्को कंपनीच्या आजूबाजूच्या ११ ग्रामपंचायतीतील शेतकऱ्यांसमवेत मुख्य ४० मंडळीही उपस्थित होती.

कंपनीचे माणगाव प्लांटचे हेड श्री. इन क्यो बे यांनी कार्यक्रमामागची कंपनी व्यवस्थापनाची एकूण सामाजिक उत्तरदायित्त्वा बद्दलची प्रामाणिक इच्छा बोलून दाखवली व आजूबाजूच्या परिसराची प्रगती हा कंपनीच्या दृष्टीने किती महत्वाचा विषय आहे या बद्दलही ग्वाही दिली, बरोबरीने नैसर्गिक व शाश्वत शेती का उपयोगी आहे हेही थोडक्यात अवगत केले. या संवादाचे भाषांतर व्यवस्थापन विभाग प्रमुख श्री. महेंद्र तट्टे यांनी केले तसेच पोस्को कंपनीच्या सी एस आर उपक्रमांची अद्ययावत माहिती देण्यात आली...

ज्ञानेश्वर बोडके यांनी त्यांच्या नैसर्गिक शेतीच्या व अभिनव फार्मर्स क्लब च्या यशाची माहिती देताना आपण सगळ्या शेतकऱ्यांनी नैसर्गिक / रासायनिक खते औषधे विरहित शेती का करायला हवी याचे महत्व सांगताना खालील मुद्यांचा समावेश केला.



भारत हा शेती प्रधान देश आहे पण सध्याच्या काळात त्यातील नाविन्यता व उद्योगाचा दृष्टीकोण कमी झाल्यामुळे शेती नुकसानीत आहे असे वातावरण आहे. औषध व रासायनिक खते बनवणाऱ्या कंपन्या व्यापार म्हणून त्यांच्या उत्पादनांची विक्री करीत आहेत. याला पर्याय काय असे सांगताना ज्ञानेश्वर म्हणाले की अभिनव फार्मर्स क्लब एक एकर शेतीचे मॉडेल मांडते व ते कसे उपयुक ठरते आहे हेही विस्ताराने नमूद केले. या मॉडेल मधील १० गुंठे पॉली हाऊस, १० गुंठे पाले भाजी, १० गुंठे वेलवर्गीय भाजी व १० गुंठे कडधान्य व अन्य उत्पादने, गुरांचा चारा असे असू शकते, बांधावर अधिकाधिक प्रकारची फळ झाडे व हे सगळे प्रयत्न संघटित करता आले पाहिजेत. वरील सगळे करताना दोन देशी गाईंच्या आधारे ज्यात खताची गरज ही भागेल व बायो गॅस च्या माध्यमांत इंधन पुरवठाही होऊ शकेल व मुख्य म्हणजे खात्रीशीर दूध आपल्याला मिळेल. शेतीत छोट्या छोट्या कामांचे यांत्रिकीकरण केल्यास मजूर न मिळणे व कामे थोडी गतीने पूर्णत्वास नेणे अश्या अडचणी ही आटोक्यात ठेवता येईल. शेतकरी हा अन्नदाता आहे त्याने स्वाभिमानाने व सचोटीने पण उत्तम पैसे मिळवले पाहिजेत, शेतीत प्रामाणिक व नाविन्यपूर्ण प्रयत्न, शेतकऱ्यांमधील व्यसनाधीनता अश्या अनेक विषयांवर काम करणे गरजेचे आहे. कितीही पैसे असले तरी आपल्या पोटाला अन्नच लागते ते जर सकस व उत्तम असेल तरच आपले व आपल्या देशबांधवांचे आरोग्य चांगले राहू शकेल. आपण सोबत एक चांगले मॉडेल आपल्या परिसरात राबवूयांत आपल्या सगळ्यांचा यथायोग्य सहभाग मिळेल ही अपेक्षा व्यक्त केली. शेतकरी हे अन्नदाता आहेत, त्यामुळे त्यांनी आपल्या कामाची गुणवत्ता वाढवून देशाच्या अर्थव्यवस्थेत मोठे योगदान दिले पाहिजे. सामूहिक शेती हा एक नवा आणि प्रगत मार्ग असल्याचे बोडके यांनी सांगितले. शेतकरी एकत्र येऊन शेती केल्यास खर्च कमी होतो आणि एकत्रित उत्पन्न वाढवता येते याचा फायदा शेतकऱ्यांना होईल आणि उत्पादनाची गुणवत्ता देखील सुधारेल असे त्यांनी सांगितले. शेवटी आभार प्रदर्शन व पसायदान म्हणून कार्यक्रमाची सांगता झाली.

मुख्यमंत्री जनकल्याण कक्षाच्या पुढाकार

# विद्यार्थ्यांना ऑनलाईन टेस्ट सिरीजचे वाटप



**जालना । प्रतिनिधी -** मुख्यमंत्री जनकल्याण कक्ष यांच्या पुढाकाराने जालना जिल्ह्यातील ८३३ विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन टेस्ट सिरीज कार्यक्रमा अंतर्गत श्री महावीर स्थानकवासी जैन माध्य. व उच्च माध्यमिक विद्यालय, जालना येथे विद्यार्थ्यांना टेस्ट सिरीज, स्मार्ट कार्डचे वाटप केले. सीएसआर निधीमधून लोकाभिमुख कामांचे नियोजन आणि अंमलबजावणीसाठी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली मुख्यमंत्री जनकल्याण कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

या कक्षाच्या वतीने सामाजिक उत्तरदायित्व निधी (सीएसआर) मधून शालेय विद्यार्थ्यांना टेस्ट सिरिज वाटपाचा नाविन्यपूर्ण उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधत चांगला अभ्यास करा, आपल्या आवडीच्या क्षेत्रात प्रावीण्य मिळवा व उच्च शिक्षण घेऊन जालना जिल्ह्याचं नावलौकिक करावे, यासाठी सर्वांना शुभेच्छा दिल्या. यावेळी प्राचार्य, शिक्षक व विद्यार्थी यांची मोठ्या संख्येने उपस्थित होती.

# गरीब मुलांच्या चेहऱ्यावरील आनंदापेक्षा मोठा आनंद नाही - आ.कैलास गोरंट्याल

## जालना आयटीआय मधील १३ विद्यार्थ्यांना मिळाली नौकरी



**जालना । प्रतिनिधी -** दसरा, दिवाळी सारखे सन आपल्यासह प्रत्येकांच्या जीवनातील आनंदाचा क्षण असतो. मात्र, नौकरी मिळाल्याने गरीब मुलांच्या चेहऱ्यावर दिसत असलेला आनंद यापेक्षा मोठा आनंद आपल्याला झाला असे भावोद्गार आ. कैलास गोरंट्याल यांनी येथे बोलतांना काढले.

जालना येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रशिक्षण घेत असलेल्या होतकरू विद्यार्थ्यांसाठी जालना जनसेवा ग्रुप आणि आयएसआय ई इंडिया या संस्थेच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या दहा दिवसीय प्रशिक्षण शिबिरातून २१ पैकी १३ विद्यार्थ्यांना विविध नामांकित कंपन्यांमध्ये नौकरी मिळाल्याने त्यांचे कौतुक व प्रशस्तीपत्रांचे वाटप काल शुक्रवारी आ. कैलास गोरंट्याल यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी अध्यक्षपदावरून ते बोलत होते. यावेळी संस्थेच्या प्राचार्या श्रीमती रजनी एस. शेळके, जालना जनसेवा ग्रुपचे सचिव डॉ. रामनारायण जैस्वाल, सुदेश करवा आयएसआय ई इंडिया या संस्थेच्या झोनल मॅनेजर रुपाली अग्रवाल नरेश गुप्ता, सुनील राठी, संजय बाहेती, आयएसआय ई इंडिया या संस्थेचे प्रशिक्षक गणेश राजपूत यांची यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती. आपल्या भाषणात आ.गोरंट्याल यांनी जालना जनसेवा ग्रुपच्या माध्यमातून सुरू असलेल्या कार्याची प्रशंसा करून गणपती उत्सव असो की दसरा, दिवाळी सारखे सन असो या सणांचा आनंद प्रत्येकांच्या चेहऱ्यांवर दिसून येतो. परंतु जनसेवा ग्रुप आणि आयएसआय ई इंडिया या दोन्ही संस्थांच्या माध्यमातून देण्यात आलेल्या प्रशिक्षणाद्वारे या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील २१ पैकी १३ विद्यार्थ्यांना राज्यातील विविध नामांकित कंपन्यांमध्ये मिळालेल्या नोकरीमुळे आपल्याला दसरा, दिवाळी सारख्या सणांपेक्षाही मोठा आनंद झाला असल्याचे सांगून नोकरी मिळालेल्या मुलांच्या कुटुंबातील सदस्यांना किती आनंद झाला असेल याची कल्पनाच करू शकत नाही. जालना जनसेवा ग्रुपचा सदस्य म्हणून जालन्यातील जास्तीत जास्त बेरोजगार युवकांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी आपण स्वतः प्रयत्न करणार असल्याचे स्पष्ट करून आ.कैलास गोरंट्याल म्हणाले की, त्यासाठी लागणाऱ्या मदतीची काळजी करू नका, माझ्यावर सोडा सर्वोतोपरी मदत मिळवून देण्याची तयारी त्यांनी यावेळी दर्शवली.

**नौकरी मिळाल्याचे समाधान - डॉ. जैस्वाल**

गरीब कुटुंबातील मुलांना नामांकित कंपन्यांमध्ये नौकरी मिळाल्याचे मोठे समाधान मिळाले असे प्रतिपादन जालना जनसेवा ग्रुपचे सचिव डॉ रामनारायण जैस्वाल यांनी येथे बोलतांना केले. कोणत्याही गोरगरिबांना पैशाची मदत करण्याऐवजी त्यांच्या कुटुंबातील एका तरुणाला नोकरी दिल्यास सदर कुटुंबाला मोठा आधार देण्याचे काम होते हीच बाब लक्षात घेऊन जनसेवा मानव ग्रुपच्या माध्यमातून होतकरू विद्यार्थ्यांना विविध नामांकित कंपन्यांमध्ये नोकरी मिळवून देण्याचे प्रयत्न केले जात या प्रयत्नांना मोठे यश मिळत आहे. जालना शहरात दानशूरांची कमी नाही.

**स्वतःला सिद्ध केल्याचा आनंद - रुपाली अग्रवाल**

या संस्थेचे विद्यार्थ्यांनी स्वतःला सिद्ध केल्याचा आनंद आपल्याला होत असल्याचे प्रतिपादन आयएसआय इंडिया संस्थेच्या मॅनेजर श्रीमती रूपाली अग्रवाल यांनी येथे बोलतांना केले. आयएसआय इंडिया या संस्थेच्या माध्यमातून महाराष्ट्रासह देशातील अन्य राज्यात देखील असे उपक्रम सातत्याने राबविण्यात येतात. यामुळे अनेक गरीब विद्यार्थ्यांना लाभ आहे.

**हे यश अन्य विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी - शेळके**

जालना औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील तेरा विद्यार्थ्यांनी मिळवलेले यश कौतुकास्पद असून इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असल्याचे संस्थेच्या प्राचार्य रजनी शेळके यांनी सांगितले. या संस्थेत प्रवेश घेणारा हा विद्यार्थी शेतकरी, गरीब कुटुंबातील असतात. त्यामुळे तात्काळ अर्थ प्राप्त करून कुटुंबाला हातभार लागला पाहिजे हाच हेतू ठेवून अनेक जण औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रवेश घेत असतात. अवघ्या दहा दिवसांच्या प्रशिक्षण शिबिरातून १३ विद्यार्थ्यांना नामांकित कंपन्यांमध्ये नौकरी मिळाली. हे यश संस्थेच्या दृष्टीने महत्वाचे असून संस्थेतील अन्य विद्यार्थ्यांना त्यातून निश्चितपणे प्रेरणा मिळेल असा विश्वास प्राचार्या श्रीमती रजनी शेळके यांनी व्यक्त केला. यावेळी उपस्थित प्रमुख मान्यवरांच्या हस्ते यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक त्यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरव केला. कार्यक्रमाचे संचालन व आभार शाम चव्हाण यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेतील झुंजे, मगरे, ठाकरे, बनसोडे, राहुल साळवे, झीने, पवन मुंडलीक, सपकाळे यांच्यासह अन्य शिक्षक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# ५१ वर्षीय ईसमाचा मृतदेह आढळून आला

**जालना । प्रतिनिधी -** जालना येथील पोलीस हेड क्वार्टरच्या पाठीमागे ५१ वर्षीय इसामाचा मृतदेह आढळून आला. ही घटना शुक्रवार (दि २०) रोजी सकाळी साडे दहा वाजेच्या सुमारास उघडकीस आली. याची माहिती स्थानिक नागरिकांनी तात्काळ तालुका पोलीस ठाण्याला ११२ नंबर वर दिली असता पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत मृतदेह पाण्याबाहेर काढून घटनेचा पंचनामा केला. ईसमास जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केला असता डॉक्टरांनी त्यास तपासून मृत्त घोषित केले. विनोद जाधव वय ५१ वर्षे रा. जालना असे मयताचे नाव आहे. याप्रकरणी तालुका पोलीस ठाण्यामध्ये आकस्मित मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास वरिष्ठांच्या आदेशावरून पोलीस हेडकॉन्स्टेबल बेराड हे करीत आहेत.

## बुधवारी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेच्या भरती मेळाव्याचे आयोजन

**जालना -** राज्यातील युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देऊन त्यांची रोजगार मिळण्याची क्षमता वाढविण्यासाठी मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजना कार्यान्वयीत करण्यात आली आहे. जिल्ह्यातील अधिकाधिक उमेदवारांना संधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने जालना येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत बुधवार दि. २५ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी १० वाजता मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेच्या भरती मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

जालना जिल्ह्यातील जवळपास ६० ते ७० आस्थापना बेरोजगार युवकांची भरती करण्यासाठी मेळाव्यामध्ये उपस्थित राहणार आहेत. तरी या मेळाव्यासाठी बारावी, आयटीआय तसेच पदविका व पदवीधर अशी शैक्षणिक अहर्ता प्राप्त असलेले १८ ते ३५ वयोगटातील सर्व उमेदवार या योजनेचा लाभ घेऊ शकणार आहेत. अधिक माहितीसाठी ए.एस.धाबे ९९२२५३१७६६ आणि एस.जी. चव्हाण ९७६३६०७८५० यांच्याशी संपर्क साधावा. या संधीचा सर्व बेरोजगार युवकांनी मेळाव्यास उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्य तथा सहायक प्रशिक्षणार्थी सल्लागार आर. एस. शेळके यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

## राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार कार्यक्रम रविवारी सह्याद्री वाहिनीवर

**मुंबई-** राज्यातील १०९ गुणवंत शिक्षकांचा ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिनाचे औचित्य साधून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते 'क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार' देऊन गौरव करण्यात आला. या पुरस्कार समारंभाचे प्रसारण रविवार दि. २२ सप्टेंबर २०२४ रोजी सायंकाळी ६ वाजता मुंबई दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवरून केले जाणार आहे. मुंबईतील एनसीपीएच्या सभागृहात या समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. ज्यांना हा समारंभ पाहता आला नाही, त्यांच्यासह सर्वांनी सह्याद्री वाहिनीवर प्रसारित होणारा हा कार्यक्रम अवश्य पाहावा, असे आवाहन शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी केले आहे. जयु भाटकर आणि वैष्णो व्हिजन यांनी या कार्यक्रमाची निर्मिती केली आहे.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.